# महाराष्ट्र शासन
# अल्पसंख्याक विकास विभाग
# जाहिरात

वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ८३ मधील तरतुदींनुसार त्रिसदस्यीय महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबादची स्थापना करण्यात आलेली असून सदर अधिनियमातील कलम ८३(४)(बी) तसेच महाराष्ट्र राज्य वक़्फ़ नियम, २०२२ मधील नियम ४५(बी)(२) मधील तरतूदीनुसार सदर न्यायाधिकरणावर " राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाचा वा समकक्ष दर्जाचा शासकीय अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने अथवा या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याच्या नियुक्तीद्वारे" सदर न्यायाधिकरणावर सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. सदर पदासाठीच्या अर्हता/अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत-

१) "राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी या पदाच्या समकक्ष पद ( वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० किंवा ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० ) धारण करत असावा. अथवा अशा पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

२) सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६२ पेक्षा अधिक नसावे.

**इतर अटी व शर्ती**

अ) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचा सदस्य हा अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असेल.

ब) सदर सदस्याच्या प्रथम प्रतिनियुक्तीचा/नियुक्तीचा कार्यकाळ हा त्याने आपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्ष असा असेल. शासनास सदर कालावधी पुढे दोन वर्षासाठी वाढविता येईल.

क) सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यास मूळ संवर्गातील नियमित वेतनश्रेणीतील वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील. सेवानिवृत्त अधिकाऱ्यास मूळ संवर्गातील सेवानिवृत्तीच्या वेळचे नियमित वेतनश्रेणीतील वेतन वजा सेवानिवृत्ती वेतन या दराने वित्तलब्धी अनुज्ञेय राहील.

वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणावर सदस्य म्हणून काम करण्यास इच्छूक अधिकाऱ्यांनी **दि.३०.०७.२०२२** रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यत **अवर सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, खोली क्र.७१४, ७ वा मजला, मंत्रालय (विस्तारित), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२ यांच्याकडे ई-मेल क्र.desk4.mdd-mh@gov.in/ टपालाने/ कुरिअरने** सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज

सादर करावा. अपूर्ण आणि विहित दिनांक व वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

प्राप्त अर्जांचे मूल्यमापन करुन, आवश्यकता भासल्यास मुलाखती घेऊन पात्र अधिकाऱ्यांची निवड करण्यात येईल.

**सही/-**
**उप सचिव,**
**अल्पसंख्याक विकास विभाग**

**महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे सदस्य नियुक्तीसाठी राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी अथवा समकक्ष दर्जाचे अधिकारी अथवा या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याकडून मागविण्याचा अर्जाचा नमूना**

| फोटो |
|---|

१ नाव :

२ सेवेत असल्यास सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी:

३ सध्याचा पत्ता :

४ जन्मदिनांक :

५ कार्यालयाचे नाव व पत्ता :

६ सेवानिवृत्त असल्यास

अ) सेवानिवृत्तीवेळचा कार्यालयाचा पत्ता :

आ) सेवानिवृत्तीचा दिनांक :

इ) सेवानिवृत्ती वेळचे पदनाम व वेतनश्रेणी :

७ भ्रमणध्वनी क्रमांक :

८ दूरध्वनी क्रमांक :

९ ई-मेल :

१० कायमचा मूळ पत्ता :

११ शैक्षणिक पात्रता :

१२ राज्य शासनातील कामाचा अनुभव :

| अ.क्र | पदाचे नाव | विभाग | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |

१३ मुल्यांकन अहवाल/गोपनीय अहवाल (लगतच्या ५ वर्षाचे) :

| अ.क्र. | वर्ष | प्रतवारी |
|---|---|---|

१४ भाषेचे ज्ञान आहे किंवा नाही याबाबतची माहिती (होय/नाही) :

| भाषा | लिहिणे | वाचणे | बोलणे |
|---|---|---|---|
| मराठी | - | - | - |
| हिंदी | - | - | - |
| इंग्रजी | - | - | - |
| उर्दू | - | - | - |

१५ सेवाकाळातील किंवा सेवानिवृत्तीनंतर कोणतीही विभागीय चौकशी,फौजदारी प्रकरण, लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरण, न्यायालयीन प्रकरण किंवा इतर कोणतीही कार्यवाही : प्रलंबित/ चालू असल्यास त्याबाबतचा तपशील :

१६ वरील १५ प्रकरणी झालेले निर्णय :

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# घोषणा

मी श्री/श्रीमती ............................ असे प्रमाणित करते/करतो की, मी प्रतिनियुक्तीने/नियुक्तीने भरावयाचा पदाच्या मागणी पत्रातील तपशील वाचले असून, सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदा पदावर प्रतिनियुक्तीसाठी/नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

दिनांक :
ठिकाण :

सही.....................................

नाव.......................................

पदनाम.................................